# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ११/२००७.** **दिनांक १४.१०.२००७**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- दुपारी ३.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे रविवार दिनांक १४ ऑक्टोबर, २००७ रोजी आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-१६३३६-२००७, दि. ०८.१०.२००७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा रविवार दिनांक १४ ऑक्टोबर, २००७ रोजी दुपारी ३.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष
०२. मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे,उपाध्यक्ष
०३. मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक
०४. मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर
०५. मा.सौ.सुमित्रा कैलास कोते

मा.श्री.भाऊसाहेब रा. वाकचौरे,
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती नसल्याने अर्धा तास मा.सदस्यांची वाट पाहून नंतर दुपारी ३.३० वाजता सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.पांडूरंग गमाजी अभंग,मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे,मा.श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा.श्री.समि खतीब, मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा, मा.श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय, मा.डॉ.पी.एल.तिवारी, यांनी दूरध्वनीवरुन कळविले त्याची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **संस्थान अधिनियम दुरुस्ती, नियम दुरुस्ती व विनियमाचे मसुद्यास मान्यता देणे बाबत**

**निर्णय क्र.७७८** व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.७.२००५ चे सभेतील निर्णय क्र.३६९ अन्वये खालील टप्पा १ मधील कामे श्री.सुधाकर जोशी, आय.ए.एस.(सेवा निवृत्त) यांचेकडून करुन घेण्यास व याकामी त्यांना रुपये १ लाख मानधन देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

१) अधिनियम दुरुस्ती.
२) नियमावली दुरुस्ती.
३) सभा कामकाज नियमावली.
४) सल्लागार समिती नियमावली.
५) छाननी समिती नियमावली.
६) भक्त मंडळ सभा विनियम.
७) भक्त मंडळ सदस्यत्वाच्या अटी/शर्ती.

त्यानुसार मा.श्री.सुधाकर जोशी,आय.ए.एस.(सेवानिवृत्त),पुणे यांनी खालीलप्रमाणे संस्थान अधिनियम दुरुस्ती, नियम दुरुस्ती व विनियमाचे मसुदे तयार करुन आजचे सभेत सादर केले होते.

| |
|---|
| a) Proposed amendmends to the Act |
| b) Rules 2007 Comparitive Chart |
| c) Regulations for Meeting of the Commettee |
| d) Draft Regulation of Sub-Committees (vide Section 17 of the Act) |
| e) Advisory Council- Draff Regulations |
| f) Regulations for Scrutiny Commiittee |
| g) Bhakta Mandal Draft Regulations (vide Section 19 of the Act) |

आजचे सभेत मा.श्री.सुधाकर जोशी,आय.ए.एस.(सेवानिवृत्त),पुणे हे समक्ष उपस्थित होते. त्यांनी तयार केलेले वरीलप्रमाणे संस्थान अधिनियम दुरुस्ती, नियम दुरुस्ती व विनियमाचे मसुद्यांची सविस्तर माहित सभेस करुन दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त टप्पा क्र.०१ मधील सादर केलेल्या मसुद्यांची नोंद घेण्यात येऊन, सदरहू मसुदे व्यवस्थापन समितीचे मा.सदस्यांना पाठवून याबाबत त्यांचे अभिप्राय/ दुरुस्त्या लेखी स्वरुपात मागविण्यात याव्यात, असे ठरले. त्याचप्रमाणे मा.श्री सुधाकर जोशी यांना याकामी देय असलेली कन्सल्टेशन फी रुपये १,००,०००/- देण्यात यावी असे ठरले.

तसेच व्यवस्थापन समितीचे दिनांक ३१.३.२००७ चे सभेतील निर्णय क्र.२९६ अन्वये टप्पा क्र.२ मधील खालीलप्रमाणे कामे मा.श्री.सुधाकर जोशी,आय.ए.एस. (सेवा निवृत्त) यांचेकडे सोपविण्यास व त्यांचे मानधन मा.अध्यक्ष महोदय, यांनी ठरविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

०१) बांधकाम भांडार/खरेदी नियमावली

०२) कर्मचारी सेवा नियमावली

०३) अधिकारी/कर्मचारी आकृतीबंध

त्याऐवजी मा श्री सुधाकर जोशी यांनी दिनांक ०९.१०.२००७ चे पत्राने दुसऱ्या टप्प्यामध्ये खालील कामांसाठी रुपये १,००,०००/- कन्सल्टन्सी फीची मागणी केलेली आहे.

०१) कर्मचारी सेवेच्या सर्वसाधारण शर्ती -विनियम

०२) वेतन व भत्ते विनियम

०३) कर्मचारी वर्तन विनियम

०४) शिक्षा व अपील विनियम

०५) रुजू तारीख, सेवा निलंबनातील वेतन, सेवेतून कमी करणेचे विनियम

०६) रजा विनियम

मा.श्री सुधाकर जोशी यांना वरील कामा प्रित्यर्थ रुपये १,००,०००/-(अक्षरी रुपये एक लाख मात्र) कन्सल्टन्सी फी अदा करण्यास मान्यता देण्यात आली व सदरची कामे माहे जानेवारी,२००८ अखेर तातडीने पूर्ण करुन घ्यावीत असे श्री जोशी यांना सांगण्यात आले व त्यास त्यांनी मान्यता दिली.

(कार्यवाही-अधिक्षक,अभिलेखा कक्ष)

**यानंतर मा.अध्यक्षांचे परवानगीने आयत्यावेळेचे विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **व्दारावती इमारतीचा ४था मजला वाढविणेकामी आलेल्या निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.७७९** श्रीसाईबाबा संस्थान मार्फत स.नं.१४८मध्ये व्दारावती इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सदर इमारतीचे ग्राउंड अधिक तीन मजल्यांचे आर.सी.सी.काम अंतिम टप्प्यात आहे. या इमारतीचे ४ थ्या मजल्यावर नव्याने बांधकाम करुन अतिमहत्वाचा व्यक्तींसाठी (VIP) खोल्या बांधणेसाठी व धर्मशाळेकडे जाणा-या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणेसाठी सुधारीत एकुण रु. ५,२२,८४,०१५.०० खर्चास व जाहीरात देउन निविदा मागविण्यास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/०५/२००७ सभेत नि. क्र.४४० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार वर्तमानपत्रात जाहीरात देवून निवीदा मागविण्यात आलेल्या आहेत.निवीदा विक्री दि.२९/०६/२००७ ते दि.१३/०७/२००७ अखेर ठेवण्यात आलेली होती. दरम्यान सध्याच्या व्दारावती इमारत बांधकामाचे ठेकेदार मे. गोलानी बिल्डर्स, मुंबई यांनी त्यांचे दि. ३०/०६/२००७ चे पत्रान्वये ते सध्याच ५ कोटीपेक्षा अधिक रकमेचे काम करीत असल्यामुळे ठेकेदाराचे पूर्वपात्रतेसाठीची वार्षिक अर्थिक उलाढालीबाबतची अट शिथिल करणेची विनंती केली होती.त्यानुसार ठेकेदाराचे पूर्वपात्रतेसाठी वार्षिक अर्थिक उलाढालीबाबतची अट रू.२.०० कोटी प्रतीवर्ष पर्यत शिथिल करणेसाठी वर्तमानपत्रात जाहीरात-दुरुस्तीपत्र प्रसिदध करण्यात येउन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. १३/०७/२००७ अखेर मुदतीत खालील ठेकेदारांनी निविदा विकत घेतलेल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | हर्ष कन्स्ट्रक्शन, नाशिक. | ०२ | क्रांती कन्स्ट्रक्शन, नाशिक. |
| ०३ | गोलानी बिल्डर्स , मुंबई. | ०४ | आर्च-इन्फ्रा प्रोजेक्ट निर्माण प्रा. लि., पुणे. |
| ०५ | ज्योती कन्स्ट्रक्शन्स, नाशिक | | |

निवीदेतील तरतुदीनुसार दि. १९ जुलै, २००७ रोजी निवीदेतील अडी- अडचणी, त्रुटीसंदर्भात संबंधीत प्रकल्पाचे आर्किटेक्ट यांचे प्रतिनीधी, संस्थान अधिकारी व निवीदाधारकांची निवीदा पूर्व बैठक बोलविण्यात आली होती. सदर बैठकीत निवीदा धारकांच्या निवीदेच्या संदर्भातील शंकांचे निरसन करण्यात आले सर्व उपस्थित निवीदाधारकांना बैठकीतील चर्चेस अनुसरुन Common Set Deviations प्रती पाठविण्यात आल्या आहेत. सर्व निवीदाधारकांना निवीदेतील बदल लक्षात घेऊन सिलबंद निवीदा सादर करणेस सांगण्यात आले. तसेच निवीदा सादर करण्याची मुदत दि. २८ जुलै, २००७ रोजी सायंकाळी ६.३० पर्यंत ठेवण्यात आली होती, ती मुदत दि. २८ जुलै,२००७ रोजी सकाळी १० वाजेपर्यंत करण्यात आली असल्याचे निवीदाधारकांना कळविण्यात आले होते. त्यानुसार विहीत मुदतीत खालील दोनच ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

१) गोलानी बिल्डर्स , मुंबई.

२)ज्योती कन्स्ट्रक्शन्स, नाशिक.

सध्या व्दारावती या निवासस्थान इमारतीचे तीन ही मजल्याचे बांधकाम ८० टक्के पूर्णात्वास आलेले आहे. चौथ्या मजल्याचे बांधकामाचा निर्णय मा. व्यवस्थापन समितीने घेतलेला असल्याने, या मजल्यावरील (टेरेस) प्लंबिग, सॅनिटेशन, टेरेस वॉटरप्रुफींग, सोलर सिस्टिम, लिफ्ट रुम आदिचे काम काम पुर्ण करता येत नाही. तसेच प्लंबिग, सॅनिटेशन आदिची पाईप फिटिंग्ज टेरेस पातळीपर्यन्त आणून

सोडण्यात आलेल्या आहेत. या सर्व कारणांचा विचार करता प्रस्तावित चौथ्या मजल्याचे बांधकाम त्वरीत सुरु होणे
अत्यंत आवश्यक असल्याने मा. व्यवस्थापन समितीच्या आजचे सभेपुढे प्राप्त झालेल्या दोन बांधकाम निविदा उघडणेत आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :

| अ.न. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेत देऊ केलेले दर |
|---|---|---|
| ०१ | मे.गोलानी बिल्डर्स,मुंबई | ३२.३२ % अधिक |
| ०२ | मे.ज्योती कन्स्ट्रक्शन,नाशिक | २८.८० % अधिक |

उपरोक्त दोन्ही ठेकेदार यांना निविदेतील दर कमी करणेबाबत विनंती करण्यात आली असता मे.ज्योती कन्स्ट्रक्शन,नाशिक यांनी निविदेतील दरात बदल केला नाही. मे.गोलानी बिल्डर्स,मुंबई यांनी त्यांनी देऊ केलेल्या दरात ४.६% सुट देऊ केली. त्यामुळे उपरोक्त निविदासादरकर्त्यांचे दर खालीलप्रमाणे येतात.

| अ.न. | निविदासादरकर्त्याचे नांव | सुट नंतर देऊ केलेले अंतिम दर |
|---|---|---|
| ०१ | मे.गोलानी बिल्डर्स,मुंबई | २७.७२ % अधिक |
| ०२ | मे.ज्योती कन्स्ट्रक्शन,नाशिक | २८.८० % अधिक |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.गोलानी बिल्डर्स,मुंबई यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावे असे ठरले

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

वरील निर्णय क्र.७७८ ते ७७९ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी